एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प (ग्रा) निलंगा 1
पंचायत समिती निलंगा
ई-मेल – cdponilanga1@gmail.com

I.C.D.S

वाचा :-

1. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : एबावि-2022/ प्र.क्र.94/का-06 दिनांक 02 फेब्रुवारी, 2023
2. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : एबावि-2022/ प्र.क्र.94/का-06 दिनांक 11 ऑगस्ट 2023
3. . महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : एबावि-2022/ प्र.क्र.94/का-06 दिनांक 27 फेब्रुवारी 2024
4. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : एबावि-2022/ प्र.क्र.94/का-06 दिनांक 30 जानेवारी 2025.
5. मा.जिल्हा कार्यक्रम अधिकारी मबावि जि प लातूर याचे पत्र दिनांक जाक्र/जिपला/बाकवि/ कार्या-4/ सीआर/कावि- दिनांक 26/05/2026

क्र. २०२६ जिपला/एबाविसेयोनि/कार्या-०२/सीआर-......../कावि- .........
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प (ग्रामिण) निलंगा 1**
दिनांक :- ०३/०७/२०२६

# जाहिरात

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प (ग्रामिण) निलंगा 1

**अंगणवाडी सेविका / मदतनीस पदाकरीता सरळ नियुक्तीने (By Nomination) भरती – २०२६**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प (ग्रामीण) निलंगा 1 ता. निलंगा जि.लातूर जिल्हा परिषद, लातूर अंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस या रिक्त पदाची भरती प्रक्रिया अनुषंगाने संदर्भ क्रमांक ०१ ते ०५ च्या अधिन राहून याद्वारे पात्र महिला उमेदवारांकडून याद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख **१७-०७-२०२६** रोजी **सायंकाळी ६.०० वा.** (कार्यालयीन वेळेपर्यन्त) अशी राहील. **बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय (ग्रामीण) निलंगा 1 ता.निलंगा जि.लातूर येथे सुट्टीचा दिवस वगळता कार्यालयीन वेळेत अर्ज स्वीकारण्यात येतील.**

**भरती प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | अर्ज स्वीकारण्याचा सुरुवातीचा दिनांक | ०६-०७-२०२६ |
| ०२ | अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक | १७-०७-२०२६ सायं.६-१५ पर्यन्त |
| ०३ | अर्ज छानणी करुन उमेदवारांची प्राथमिक गुणवत्ता यादी प्रकाशीत करणे संभाव्य दिनांक ( परिशिष्ट ब ) | १०-०८-२०२६ |

| | | |
|---|---|---|
| ०४ | प्रकाशीत केलेल्या **यादीवर** आक्षेप नोंदविण्याचा अंतिम दिनांक (संभाव्य) | २४-०८-२०२६ |
| ०५ | आक्षेप पुर्तता केल्यानंतर अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रकाशित करणे | २७-०८-२०२६ |
| ०६ | अंतिम निवड **यादी नुसार पात्र** महिला उमेदवाराची **मुळ** कागदपत्रे तपासणी करणे व नियुक्ती आदेश देणे | २८-०८-२०२६ ते ३१-०८-२०२६ |

**पदभरती करावयाच्या रिक्त अंगणवाडी केंद्रांचा तपशील**

## अंगणवाडी सेविका

| अ. क्र. | ग्रामपंचायतीचे नांव | गावाचे नांव | अंगणवाडी केंद्राचे नांव व क्रमांक | अंगणवाडी प्रकार | पद |
|---|---|---|---|---|---|
| 01 | राठोडा | राठोडा | राठोडा 2 | नियमीत | अंगणवाडी सेविका |
| 02 | हाडोळी | हाडोळी | हाडोळी 01 | नियमीत | अंगणवाडी सेविका |
| 03 | निटूर | माचरटवाडी | माचरटवाडी | नियमीत | अंगणवाडी सेविका |

## अंगणवाडी मदतनीस

| अ. क्र. | ग्रामपंचायतीचे नांव | गावाचे नांव | अंगणवाडी केंद्राचे नांव व क्रमांक | अंगणवाडी प्रकार | पद |
|---|---|---|---|---|---|
| 01 | कोकळगाव | कोकळगाव | कोकळगाव 3 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 02 | अंबुलगा बु | अंबुलगा बु | अंबुलगा बु 1 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 03 | मसलगा | मसलगा | मसलगा 3 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 04 | शिरोळ वां | शिरोळ वां | शिरोळ वां 2 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 05 | राठोडा | राठोडा | राठोडा 2 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 06 | रा.मुदगड | रा.मुदगड | रा.मुदगड 1 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 07 | रा.मुदगड | रा.मुदगड | रा.मुदगड 3 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 08 | माळेगाव जे | माळेगाव जे | माळेगाव जे 2 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 09 | अंबुलगा बु | अंबुलगा बु | अंबुलगा बु 5 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 10 | हंचनाळ | हंचनाळ | हंचनाळ | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 11 | बामणी | बामणी | बामणी 1 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 12 | उमरगा हा | उमरगा हा | उमरगा हा 2 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 13 | मदनसुरी | मदनसुरी | मदनसुरी 7 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 14 | मदनसुरी | मदनसुरी | मदनसुरी 4 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 15 | मुगाव | मुगाव | मुगाव 1 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 16 | ताजपूर | ताजपूर | ताजपूर | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 17 | वळसांगवी | वळसांगवी | वळसांगवी | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |
| 18 | राठोडा | राठोडा | राठोडा 2 | नियमीत | अंगणवाडी मदतनीस |

उमेदवाराच्या **निवड करण्याच्या अटी व शर्ती** खालीलप्रमाणे

१. **शैक्षणिक पात्रता :-** अंगणवाडी सेविका / अंगणवाडी मदतनीस या पदासाठी ***किमान*** इयत्ता १२ वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) अशी किमान शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील. (गुणपत्रिकेची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील) तसेच कमाल शैक्षणिक अर्हतेच्या सर्व सुस्पष्ट गुणपत्रिका ( पास / नापास ) यावरुन टक्केवारी निश्चीत करता येईल अशा **सर्व गुणपत्रिकेची छायांकित प्रती (Xerox) सक्षम प्राधिका-याकडून साक्षांकित केलेल्या असाव्यात.** इयत्ता १२ वी, पदवी, पदव्युत्तर, डी.एड., बी.एड., Ms-Cit अथवा शासनाने वेळोवेळी समकक्ष ठरविलेला संगणक अभ्यासक्रम इत्यादी शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारावर गुण देण्यात येणार आहेत. तरी वरील कागदपत्रे अर्जासोबतच सादर करणे बंधनकारक राहील.

२. **वास्तव्य :- स्थानिक रहिवाशी असणे आवश्यक आहे, अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस** या पदावर फक्त त्या गावातील ग्रामपंचायत नव्हे तर महसुली गाव / वाडी / वस्ती / पाडे यासह मधील रहिवाशी असतील त्यांनाच स्थानिक समजण्यात येईल. (स्थानिक रहिवाशी असल्याबाबत तहसिलदार यांचे रहिवासी प्रमाणपत्र / तलाठी/ग्रामपंचायत अधिकारी यांचे रहिवासी प्रमाणपत्र / स्वंय घोषणापत्र प्रमाणपत्र या सोबतच रहिवाशी असल्याचा पुरावा म्हणुन मतदार ओळखपत्र, आधारकार्ड, रेशन कार्ड, विद्युत बील इत्यादी सोबत जोडावे.)

३. **वयाची अट :- अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस या पदासाठी दिनांक** ३०-०६-२०२६ रोजी अर्जदार महिलेचे वय किमान १८ वर्षे पूर्ण व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे, विधवा उमेदवारांसाठी ही वयोमर्यादा कमाल ४० वर्षे अशी राहील. अर्जासोबत जन्म तारखेचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला / इयत्ता १० वी ची सनद जोडणे अनिवार्य राहील.

४. **जातीचे प्रमाणपत्र :-** उमेदवार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासप्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्ग मध्ये मोडत असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारावर महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी, २०२५ चे परिशिष्ट नुसार अतिरिक्त गुण देण्यात येणार आहेत

५. **भाषेचे ज्ञान :-** मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने इयत्ता १० वी अथवा शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी, २०२५ मधील परिशिष्ट मध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ज्या अंगणवाडी केंद्राकरीता अंगणवाडी सेविका / अंगणवाडी मदतनीसची नियुक्ती करावयाची आहे. अशा अंगणवाडीमध्ये ५०% पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरिक्त इतर भाषा (उदा. उर्दू,हिंदी, कन्नड, बंजारा इत्यादी पैकी एक भाषा) बोलणारी असतील तर तेथील अंगणवाडीमध्ये सेविका/ मदतनीस यांच्या पदावर सदर भाषेचे ज्ञान असलेल्या (लिहिता व वाचता येणे) उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.तथापी, अशा उमेदवाराने इयत्ता १० वी अथवा परिशिष्ट मध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

६. **लहान कुटूंब :-** अंगणवाडी सेविका / अंगणवाडी मदतनीस या पदासाठी सरळ सेवेने नियुक्तीसाठी लहान कुटूंबाची अट खालीलप्रमाणे लागू राहील.

I) लहान कुटूंब याचा अर्थ, उमेदवारास जास्तीत जास्त दोन हयात अपत्ये.

II) उमेदवाराला दोन हयात अपत्यांपेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) अधिक अपत्ये असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही. जर सदर बाब नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला मानधनी सेवेतनू तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल तसेच सेवा कालावधीमध्ये त्यास दोन हयात अपत्ये (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) असून देखील तिसरे अपत्य झाल्यास त्याची मानधनी सेवा समाप्त करण्यात येईल.

७. **अर्जदाराचे नावात बदल असल्यास :-** अर्जदाराच्या नावात बदल असल्यास विवाह नोंदणी दाखला किंवा नावात बदल असल्याबाबतचे राजपत्र (Gazzate)किंवा नोंदणीकृत (सेतू / नोटरी) हलफनामा/ शपथपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

८. **विधवा व अनाथ** उमेदवारांबाबत **तरतूद :-**

I) उमेदवार विधवा असल्यास त्याबाबत स्वंय-घोषणापत्र व त्यासोबत पतीच्या मृत्यूचे प्रमाणपत्र संलग्न करणे बंधनकारक राहील.

II) उमेदवार अनाथ असल्यास सक्षम प्राधिका-याचे (महिला व बाल विकास विभागाचे) प्रमाणपत्र आवश्यक राहील.

९. **अनुभव असल्यास :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प योजनेचा अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविका / अंगणवाडी मदतनीस म्हणुन अनुभव असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडावे. **खाजगी मान्यताप्राप्त अथवा खाजगी** अनुदानित **संस्थेतील सेवा, अनुभव ग्राहय धरता येणार नाही.** अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविका / अंगणवाडी मदतनीस म्हणुन कामकाजाचा ०२ वर्षाचा अनुभव असल्यास महिला व बालविकास विभागाच्या शासन निर्णय ३० जानेवारी , २०२५ चे परिशिष्टानुसार अतिरिक्त गुण देण्यात येणार आहेत.

१०. **सेवा व मानधन :-** अंगणवाडी मदतनीस हे पद मानधनी स्वरुपाचे असून या पदासाठी बदलीसाठी मागणी करता येणार नाही. तसचे या पदाकरीता सेवा, निवृत्ती, मानधन इत्यादी बाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रक लागू राहतील.

११. सेवासमाप्तीसाठी **वयाची अट :-** शासन निर्णय दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३ व दिनांक ३० जानेवारी २०२५ अन्वये नियुक्त होणा-या अंगणवाडी सेविका / अंगणवाडी मदतनीस यांची सेवा ६० वर्षे पूर्ण होईपर्यन्त किंवा त्या शाररिकदृष्टया काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तोपर्यन्त सुरु ठेवण्यात येईल.

१२. **बदली :-** अंगणवाडी कर्मचारी हे एकाकी पद असल्यामुळे तसेच ती स्थानिक रहिवाशी असावी या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना विचारात घेता अंगणवाडी कर्मचा-यांना बदलीचे कोणतेही प्रावधान राहणार नाही.

१३. **अर्ज विहित नमुन्यात सादर करावा :-अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे सक्षम प्राधिका-याकडून साक्षांकित केलेली असावीत.** अर्जामध्ये किंवा प्रमाणपत्रावर कोणतीही खाडाखोड असलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. अर्ज हा विहित नमुन्यातच असावा. तसेच अर्ज सादर करीत असताना संबंधित उमेदवार यांनी स्वत: बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय (ग्रामिण) निलंगा 2 यांचे कार्यालयात उपस्थित असणे आवश्यक राहील.अर्ज एकदा सादर केल्यानंतर कोणतेही कागदपत्रे / प्रमाणपत्र स्वीकारले जाणार नाहीत व त्याचा गुणदानासाठी ग्राहय धरले जाणार नाहीत.

१४. **निवड कशी केली जाईल :-** अर्जासोबत जोडलेल्या शैक्षणिक व इतर कागदपत्रांच्या आधारे दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्टानुसार गुणवत्ता यादी (Merit List) तयार केली जाईल व गुणवत्तेनुसार निवड व प्रतिक्षा यादी तयार केली जाईल. **दिनांक १७-०७-२०२६ नंतर कोणताही अर्ज कोणत्याही माध्यमाद्वारे स्वीकारला जाणार नाही.** आक्षेपाचेवेळी असे कोणतेही कागदपत्रे स्वीकारले जाणार नाहीत.

१५. विहित नमुन्यातील अर्ज प्रकल्प कार्यालयात स्वत: महिला उमेदवार यांनी आवश्यक ती शैक्षणिक व इतर कागदपत्रे साक्षांकित करुन सादर करणे बंधनकारक असून कोणत्याही परिस्थीतीत पोस्टाद्वारे पाठविलेल्या, ऑनलाईन, ई मेल द्वारे अथवा अन्य मार्गांनी पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१६. अंगणवाडी पदभरती संपुर्णत: शासन निर्णयाच्या आधारे, कोणत्याही हस्तक्षेप विरहित तसेच पारदर्शक पणे होत आहे त्यामुळे भरती करीता कोणाच्याही भुलथापांना बळी पडु नये.

१७. अर्जासोबत जोडलेल्या साक्षांकित प्रती किंवा कागदपत्रे कोणत्याही परिस्थीतीत उमेदवारांस परत केली जाणार नाहीत.

१८. सदर भरती प्रक्रिये दरम्यान कार्यालयावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज भरती प्रकियेमधून रद्द करण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१९. सदरची जाहिरात दुरुस्ती अथवा रद्द करणेचा संपूर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीतांचा राहील. भरती प्रक्रिया कोणत्याही वेळी / कोणत्याही टप्प्यावर स्थगित अथवा रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीत यांना राहतील. तसेच, अंतिम निवडीपुर्वी राज्य शासनाने निवडीच्या निकषामध्ये केलेला बदल/ सुधारणा उमेदवारांना बंधनकारक राहतील.

दिनांक :- ०३-०७-२०२६
ठिकाण :- ----------------.

**बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रा)**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, निलंगा 1**

**प्रतिलिपी :-**

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, राष्ट्रीय सुचना व विज्ञान केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर.
३. मा. जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि), जिल्हा परिषद, लातूर यांना माहितीस्तव सादर.
४. मा. जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय,लातूर.
५. मा. गटविकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, निलंगा यांना माहितीस्तव सादर.
६. सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय ------------------------------ ता. निलंगा जि.लातूर यांना माहितीस्तव देवून कळविण्यात येते की, सदरील जाहिरातीबाबत दवंडीद्वारे व्यापक स्वरुपात प्रचार व प्रसिद्धी देण्यात यावी.
७.अंगणवाडी पर्यवेक्षिका विभाग -------------------------- ए बा वि से योजना प्रकल्प (ग्रा)निलंगा 1 यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव देवून सुचित करण्यात येते की, आपण सदर गावात स्वत: हजर राहून या जाहिरातीसंबंधी व्यापक प्रसिद्धी देण्यासंबंधी योग्यती कार्यवाही अनुसरुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल तात्काळ प्रकल्प कार्यालयास सादर करावा.

बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रा)
एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, निलंगा 1